




१६) सदर जमिनीची विक्रीबाबत पूर्ण करणे करता व रजिस्ट्रार कार्यालयात नोंद करणे आवश्यक कायद्याप्रमाणे जमिन मालक यांचे आता अस्तितवात व त्यावेळी राज्य सरकार व केंद्र सरकार यांची प्रचलित केलेल्या कायद्याप्रमाणे व अस्तित्वात असलेल्या कायद्याप्रमाणे लागणारे दाखले व खरेदीखत करणेकरीता आवश्यक असणारे दाखले यांची आवश्यकता असल्यास जमिन मालक हे त्यांचे खर्चाने मिळवून देतील. सदर मिळकतीचे विक्रीखत विकासक यांचे किंवा ते सांगतील त्या गृहनिर्माण संस्थेचे नांवे करुन देतील परंतु खरेदीखताकरीता लागणारा मुद्रांक शुल्क नोंदणी फी ही विकासक व जमिन मालक यांनी निम्मे भरावयाची आहे.

१७) सदर मिळकतीवर विकासक हे बांधण्यांत येणार असलेल्या नियोजित इमारत, इमारती यांचे बांधकाम करणेसाठी कॉन्ट्रक्टर तसेच इंजिनिअर्स यांची नेमणुक करणे वगैरे काम त्यांचे खर्चाने करतील व मिळकती संबंधी नियोजित इमारतीचे नकाशे तयार करणे करता वास्तुशिल्पकार नेमणे, नकाशे कादून ते न.पा अमळनेर यांचेकडून मंजुर करुन घेणेसाठी जमिन मालक यांचे तर्फे नकाशावर सहया करुन ते दाखल करणे, त्याकामी सर्व अधिकार या कराराने विकासक यांस जमिन मालक देत आहेत. या व्यतिरिक्त काही सहया संमती यांची आवश्कता असल्यास त्या वेळोवेळी देणेची जबाबदारी लिहून देणार जमिन मालक यांची राहील .

१८) सदरच्या करारांप्रमाणे वागुन करारातील मिळकतीचा व्यवहार करारांत म्हटल्याप्रामणे पूर्ण करणेसाठी स्टॅम्प, टायपिंग,झेरॉकस वगैरे तसेच रजिस्ट्रेशनचा सर्व खर्च जो येईल तो विकासक व लिहुन देणार यांनी करावयाचा आहे.

१९) सदर प्रस्तुतचे करारातील अटी व शर्तीप्रमाणे वागुन मिळकत विकसित करण्याचे काम विकासक यांनी पुरे करावयाचे आहे व सदर जमिन मालक सदर करारांत म्हटल्याप्रामणे त्याकरता आवश्यक ते सर्व सहकार्य देतील सदर करारामध्ये अटी व शर्तीनुसार जमिन मिळकत विकसित करुन त्यांची वर म्हटल्याप्रमाणे पूर्ण होईपर्यंत त्याबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास विकासक व जमिन मालक यांचे उपभयतांचे संमतीने भारतीय लवाद कायदा १९४० प्रमाणे एक किंवा अधिक लवाद नेमुन सदर लवाद जे निर्णय देतील तो उभय पक्षीय यांचेवर बंधनकारक राहील.